शुक्रवार, दि.७ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१४३ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


# देणार नव्हता तर शेतकरी कर्जमाफीची घोषणा का केली ?:विजय वडेट्टीवार यांचा संतप्त सवाल

## सोयाबीनसाठी यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यामध्ये मोर्चा काढणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नागपूर । वृत्तसंस्था

सरकार शेतकरी कर्जमाफी देऊ शकत नाही, मग घोषणा का केली? असा प्रश्न काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी विचारला आहे. जाहिराती देऊन सरकार पुन्हा दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून जाहिरातीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. लाडकी बहिण योजनेच्या जाहिरातींच्या खर्चासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीवरुन वडेट्टीवार यांनी संताप व्यक्त केला.

या माध्यमातमून राज्यातील शेतकऱ्यांना कर्ज माफी देण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे. या संदर्भात विजय वडेट्टीवार म्हणाले की, या सरकारने अनिल अंबानी यांचे ४९ हजार कोटींचे कर्ज ५०० कोटी रुपये सेटलमेंट केले आहे. आतापर्यंत उद्योग क्षेत्रातील २९ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ झाले आहे. मग शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठी हाताला लखवा मारला का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात कर्ज माफ केले जात आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठीच यांच्याकडे पैसे नाहीत का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार नसाल आणि त्यांची हाल करणार असाल तर शेतकरी तुम्हाला माफ करणार नाही. राज्यातील शेतकरी आज ना उद्या तुमच्या विरोधात उभे राहणार आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफीची घोषणा करूनही तुम्ही पैसे देत नाहीत. लोकसभा झाली, विधानसभा झाली मात्र जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये ईव्हीएममध्ये गडबड झाली नाही तर शेतकऱ्यांचा राग तुम्हाला नक्की दिसेल, असा इशारा देखील वडेट्टीवार यांनी दिला आहे.राज्यातील सोयाबीन खरेदीला मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे सोयाबीन खरेदीला मुदतवाढ दिली नाही तर आंदोलन करण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे. या संदर्भात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नसंदर्भात यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यामध्ये मोर्चा काढण्याचे आम्ही ठरवले असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. ज्या शेतकऱ्यांचा सोयाबीन खरेदी झाला नाही, त्यांच्यासाठी सरकारला प्रश्न विचारणार असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.सरकारवर आरोप झाले तर तर नेते आमदार फुटणार, खासदार फुटणार, हा फुटणार तो फुटणार असे काहीतरी मुद्दे काढते. किंवा अर्बन नक्षलवाद असे शब्द वापरले जातात. काहीच नाही सापडले तर मुसलमान सारख्या शब्दांचा वापर केला जातो. किंवा मंदिर, मस्जिद खोदा असे धंदे सुरू होतात, असा आरोप देखील वडेट्टीवार यांनी केला आहे. आमदार, खासदार फुटण्याच्या वृत्तांत काहीही अर्थ नसून हे निराधार असल्याचा दावा देखील त्यांनी केला.



# त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीचे देळुब बू.येथे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मालेगाव । संदीप कदम

अर्धापूर तालुक्यातील देळुब ( बू.) येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी त्यागमृर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या जयंतीचे दि.७ फेब्रुवारी २०२५ रोज शुक्रवार ह्या दिवशी आयोजन केले आहे. सकाळी तथागत गौतम बुद्ध ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून सकाळी ठिक ९ वाजता पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.तर रात्री ८ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायिका नागीणीताई सिध्दार्थ कवडे व संच हिमायतनगर जि




नांदेड व महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी गायक भिमशाहीर सुमेद एडके जामगा शिवणीकर व संच यांचा रमाई व भीम गीतांचा जंगी मुकाबला होणार आहे तरी या कार्यक्रमास गावातील व परिसरातील बौद्ध उपासक व उपासीका ,व भिम अनुयांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन अनिल थोरात ( उपसरपंच )देळुब ( बु.). व सार्वजनिक जयंती मंडळाकडून करण्यात आले आहे .


# जय हिंद मोफत वाचनालय कोरेगाव भीमा ग्रामपंचायतीचा एक स्तुत्य उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

हवेली । संतोष कदम

ग्रामपंचायत कोरेगाव भीमा संचलित जय हिंद मोफत वाचनालयाची संकल्पना कोरेगाव भीमाचे आदर्श सरपंच श्री. संदीप दादा ढेरंगे , उपसरपंच सौ .सविता बजरंग घावटे व ग्रामपंचायत कोरेगाव भीमा ग्रामस्थ यांच्यावतीने सर्वांसाठी खुले असणाऱ्या सार्वजनिक जय हिंद मोफत वाचनालयाची निर्मिती करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी व गोरगरीब ,सामान्य परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची



पुस्तके पैशा अभावी विकत घेऊ शकत नाहीत म्हणून जय हिंद वाचनालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करता येईल व पुढे चालून विद्यार्थी मोठ्या हुद्द्यावर येतील या उद्देशाने या वाचनालयाची निर्मिती करण्यात येत आहे.

कोरेगाव भीमा ग्रामपंचायतीच्या वतीने कोरेगाव भीमा व परिसरातील विद्यार्थी शिक्षक व पालकांना आवाहन करण्यात येत आहे की वाचनालया तर्फे पुस्तक खरेदीसाठी आपणास आवश्यक असणाऱ्या शैक्षणिक अवांतर एमपीएससी ,यूपीएससी ,सरकारी भरती इत्यादी पुस्तकांची यादी ग्रामपंचायत कोरेगाव भीमा कार्यालयात १० फेब्रुवारीपर्यंत जमा करण्यात यावी . परिसरातील विद्यार्थी शिक्षक व पालकांकडून या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले जात आहे. सरपंच ,उपसरपंच ,ग्रामपंचायत सदस्य व ग्रामपंचायत अधिकारी या सर्वांचे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानले जात आहे.

# नांदेडचे नवे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पदभार स्वीकारला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड

नांदेड जिल्ह्याचे नवे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले दि. ६ फेब्रुवारी २०२५ रोज गुरुवारी सकाळी रुजू झालेत.पूर्व जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्याकडून त्यांनी पदभार स्वीकारला. यावेळी त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत स्वागत झाले. यावेळी मावळते जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्यासह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेश



डोईफोडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले यापूर्वी सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते. सन २०१५ च्या तुकडीचे आयएएस अधिकारी असणारे राहुल कर्डिले यांनी यापूर्वी अमरावती सहाय्यक जिल्हाधिकारी , परभणी सहाय्यक जिल्हाधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा जिल्हाधिकारी आणि सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आदी पदे त्यांनी भूषविली आहेत.मावळते जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची छत्रपती संभाजी नगर येथे वस्तू व सेवा कर सहआयुक्त पदावर बदली झाली आहे. अभिजीत राऊत गेल्या अडीच वर्षापासून नांदेड येथे जिल्हाधिकारी पदावर कार्यरत होते.

# सोयाबीन खरेदी मुदत वाढीसाठी खा.लंके करणार संसदेबाहेर आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पारनेर । प्रतिनिधी

सोयाबीन खरेदीसाठी किमान एक महिन्यांची मुदतवाढ मिळावी ही आमची मागणी आहे. त्यासंदर्भात आपण संबंधित मंत्र्यांची भेट घेउन निवेदन सादर करणार आहोत. मागणीची दखल न घेतली गेल्यास सोमवारी (ता. १०) संसदेबाहेर या प्रश्नावर आंदोलन करू, असा इशारा खासदार निलेश लंके यांनी दिल्लीमध्ये पत्रकारांशी बोलताना दिला.संसदेच्या अधिवेशनामध्ये नवी



दिल्लीमध्ये असलेल्या खासदार निलेश लंके यांनी विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची नुकतीच भेट घेतली.

या भेटीनंतर पवार यांच्या निवासस्थानाबाहेर खासदार लंके यांनी पत्रकारांशी संवाद साधला. खासदार लंके म्हणाले, सोयाबीन खरेदीसाठी शासनातर्फे मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र, अद्यापही अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ भेटलीच पाहिजे. यासंदर्भात संबंधित मंत्र्यांशी आपण पत्रव्यवहार करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



राज्याचे नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ६ फेब्रुवारी २०२५ रोज गुरुवारी आपल्या एकदिवसीय दौऱ्यामध्ये नांदेड येथील पवित्र श्री.हुजूर साहिब सचखंड गुरूद्वारा येथे भेट देऊन दर्शन घेतले.(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)

# कलंबर (बु.) येथे माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती महोत्सव सोहळ्याचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उस्माननगर । प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या मौजे कलंबर ( बु. ) ता.लोहा येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी त्याग मूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची १२७ वी जयंती महोत्सव दि. ७ फेब्रुवारी गुरुवारी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ठिक १० वाजून ३५ मि. वा. सरपंच सौ. विमलबाई मन्नुसिंह ठाकुर यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण होणार आहे.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून अक्षयभाऊ बनसोडे , श्यामभाऊ कांबळे , मारोती कोठेवाड , बोईनवाड सर , रत्नमाला महेश अवलवार , तर प्रमुख पाहुणे म्हणून नरेंद्र गायकवाड ( उपसभापती पंच.स.लोहा ) , बालाजी परदेशी ( मा.जि.प. स. ) , राहुलभाऊ सोनसळे , ड . जितेंद्र सोनसळे , डि.के. कांबळे , आणि या शुभप्रसंगी प्रमुख उपस्थिती बाबुअप्पा मुक्कनवार ( मा.सभापती पंच.स.लोहा ) , उमाकांत सोरगे ( मा.पं.सदस्य ) , माधव मोकले ( उपसरपंच ) , मन्नुअप्पा मुक्कनवार ( चेअरमन से.स.सो.) , मन्नसिंग ठाकुर ( ग्रा.पं.सदस्य) , रावसाहेब पाटील भोपाळे ( मा.सरपंच ) , मारोती करडे ( मा.सरपंच ) , बापुराव मुक्कनवार , गयाबाई सोनसळे ( ग्रा.पं.सदस्या ) , डॉ.आर. जी.मुक्कनवार , डॉ.काष्टे , संत गाडगे महाराज कन्या शाळेचे मुख्याध्यापक बेद्रे , जि. प. हा. चे मुख्याध्यापक कोरे , डॉ. पल्लेवाड ( प्रा. आ.केद्र कलंबर बु.) , बाबु आण्णा गोरे ( म.गा.तंटा मुक्ती अध्यक्ष) , पशुवैद्यकीय अधिकारी , यांच्या सह अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत . दुपारी माता रमाई आंबेडकर



यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक गावातील प्रमुख मार्गाने काढण्यात येणार आहे . रात्री ९ वा. भीमगिताचा सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्रातील भीमशाहीर गौतम पानपट्टे , आणि त्यांचा संच बळीरामपूर नांदेड आणि मिलिंद राज खडसे औरंगाबाद यांचा दणदणीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे तरी परिसरातील भीमसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कोशलाबाई प्रकाश सोनसळे , प्रभावतीबाई साहेबराव कांबळे , चंद्रकलाबाई अनिल सोनसळे , अम्रपालाबाई गंगाधर सोनसळे यांच्या सह जयंती महोत्सव समिती व गांवकरी यांनी केले आहे.

## संपादकीय..

# देवेंद्र ते देवा भाऊ!

लोकनेता न्यूज नेटवर्क

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होतील असे जर कोणा भविष्यवत्त्याने अथवा राजकीय पंडिताने सांगितले असते तर त्याला सर्वांनी वेड्यात काढले असते. कारण त्यावेळी एकनाथ खडसे, विनोद तावडे, सुधीर मुनगंटीवार आणि त्याहीपेक्षा म्हणजे तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष नितीन गडकरी अशी दिग्गज नावे ही भाजपाच्या मुख्यमंत्री पदाच्या प्रमुख शर्यतीत असताना भाजपा पक्षश्रेष्ठींनी थेट यापूर्वी कोणतेही मंत्रीपद न भूषवणाऱ्या व संघटनेचे प्रदेशाध्यक्षपद हे एकमेव पद पाठीशी असलेल्या देवेंद्र फडणवीस यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड केली आणि प्रस्थापित राजकीय नेत्यांबरोबरच राजकीय पंडितांनाही आश्चर्याचा मोठा धक्का दिला. तत्पूर्वी म्हणजे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष होण्यापूर्वी भाजपाचे विधानसभेतील एक आमदार होते. १९९९ मध्ये शिवसेना-भाजपा युतीचे सरकार गेल्यानंतर २०१४ पर्यंत म्हणजे तब्बल १५ वर्षे शिवसेना आणि भाजपाच्या नेत्यांना, आमदारांना महाराष्ट्रात विरोधी पक्ष म्हणूनच प्रमुख्याने काम करावे लागले. त्यामुळे देवेंद्र फडणवीस हे विरोधी पक्षाचे आमदार म्हणून सरकारवर अधिकाधिक हल्लाबोल करत प्रकाशझोतात राहण्याचा त्या काळात प्रयत्न करत असत. मात्र २०१४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मोठा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी संपादन केला आणि त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाची राजकीय समीकरणे ही झपाट्याने बदलू लागली. महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर सर्वोच्च सत्ता स्थानी अर्थात मुख्यमंत्रीपदी नागपूरकर देवेंद्र फडणवीस यांची निवड झाली आणि महाराष्ट्र भाजपाच्या बरोबर देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय भवितव्यालाही मोठी कलाटणी मिळाली. २०१४ ते २०१९ अशी सलग पाच वर्षे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे सर्वात बलवान आणि शक्तिशाली मुख्यमंत्री होते. याचे कारण म्हणजे केंद्रामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अत्यंत शक्तिशाली सरकार होते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी असोत की केंद्रीय गृहमंत्री अमित शहा असो किंवा अगदी संपूर्ण केंद्रीय मंत्रिमंडळ असो, या सर्वांची एकमुखी आणि एक हाती ताकद ही सर्वार्थाने मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीशी ठामपणे उभी होती. अर्थात मुख्यमंत्रीपदाचा अथवा कोणत्याही मंत्रीपदाचा कोणताही अनुभव पाठीशी नसतानाही अभ्यासूवृत्ती, मुसद्दीपणा, राजकीय चातुर्य, कमालीची जिद्द आणि चिकाटी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सत्तेची नशा डोक्यात जाऊ न देण्याची विनयशीलता या स्वभाव वैशिष्ट्यांच्या जोरावर देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ ते २०१९ हा त्यांचा मुख्यमंत्री पदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ सहजरित्या यशस्वी पार केला.

अर्थात २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या काळातले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आता २०२४ या काळातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात जमीन-आस्मानाचा झालेला फरक हा लक्षात घेण्याजोगा आहे. २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या काळातील मुख्यमंत्र्यांमध्ये देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये असलेला काँग्रेस राष्ट्रवादीचा विरोधक हा अत्यंत आक्रमकपणे सभागृहात तसेच सभागृह बाहेर देखील सातत्याने व्यक्त होत राहिला. काँग्रेस राष्ट्रवादी या भाजपाच्या परंपरागत राजकीय शत्रूंवर अक्षरशा तुटून पडणारे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राने या काळात अनुभवले. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांनंतर महाराष्ट्रात जे काही राजकीय नाट्य घडले हा काळ देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी अत्यंत प्रतिकूल असा काळ होता, मात्र राजकीय स्थिती अनुकूल असो व प्रतिकूल त्या-त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणे कमालीचा संयम बाळगत राजकीय शस्त्र परजण्यात देवेंद्र फडणीस हे पारंगत झाले होते. अर्थात तरी देखील हातातोंडाशी आलेले दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपद केवळ तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळे घेण्याचा एक सात्विक संताप हा सातत्याने देवेंद्र फडणवीस यांच्या बोलण्यातून तसेच त्यांच्या देहबोलीतून या काळात व्यक्त होत राहिला. या काळात विधानसभेचे विरोधी पक्षनेते असताना स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अवमानाच्या मुद्द्यावरून सभागृहामध्ये देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलेला संताप हा तर त्यांच्या समोरील माईकची मोडतोड करण्यापर्यंत गेला होता.

स्वातंत्र्यवीर सावरकरांप्रती असलेली अपार श्रद्धा हा जरी देवेंद्र फडणवीस यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक अविभाज्य घटक असला तरी देखील तत्कालीन परिस्थितीसमोर हतबल, हताश आणि काहीसे विमनस्क स्थितीतील देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राने प्रथमच त्यावेळी पाहिले होते. अर्थात त्यानंतर महाराष्ट्रात शिवसेनेत फूट पडली आणि सत्तांतर झाले आणि जे एकनाथ शिंदे हे २०१४ ते २०१९ या त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कामाची संधी मागत होते त्याच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून काम करण्याची वेळ देवेंद्र फडणवीस यांच्यावर आली होती. त्यावेळी जरी ही बाब त्यांच्या मनाला पटली नसली तरीदेखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांची समजूत घातल्यामुळे ते एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये देखील सव्वादोन ते अडीच वर्षे उपमुख्यमंत्री राहिले आणि केवळ उपमुख्यमंत्री म्हणून राहिले नाही, तर एकनाथ शिंदे यांच्या सरकारचे सर्वार्थाने संरक्षक बनले. उत्तम समन्वयक म्हणून त्यांनी या सरकारमध्ये काम केले. अर्थात राजकीय परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरीदेखील मुसद्दीपणा, चतुर राजकीय नेता हा या प्रतिकूल परिस्थितीमधूनही कशाप्रकारे यशाच्या शिखरावर जातो हे देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या अनुभवातून महाराष्ट्रातील प्रस्थापित आणि नवोदित राजकीय नेतृत्वाला दाखवून दिले. २०२४ मध्ये तब्बल तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झालेले देवेंद्र फडणवीस हे आता कमालीचे बदलले आहे. त्यांच्यातील सर्वात मोठा आणि ठळकपणे दिसून येणारा बदल म्हणजे ते कमालीचे शांत आणि संयमी झाले आहेत. यापूर्वीच्या काळात त्यांच्यात दिसणारा आक्रस्ताळेपणा आता पूर्णपणे नाहीसा झाला आहे. प्रसार माध्यमांसमोर व्यक्त होताना मोजक्या आणि कमीत कमी शब्दांमध्ये व्यक्त होण्याची कला ही त्यांनी आत्मसात केली आहे आणि सर्वात मोठा आणि महत्त्वाचा बदल म्हणजे देवेंद्र फडणवीस हे नाव जसे भारदस्त, वजनदार आणि प्रभावी म्हणून या आधीच्या काळात परिणामकारक ठरले. त्याहीपेक्षा देवा भाऊ हे सर्वसामान्य जनतेच्या आपुलकीचे, प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे अधिक प्रतीक ठरले आहेत. त्यांच्यातील हे बदल त्यांना अधिकाधिक परिपक्वतेकडे घेऊन जाणारे तर आहेतच मात्र त्याचबरोबर राज्यातील सर्वसामान्य जनतेशी थेट जोडणारे आहेत.

## माता रमाई



दुःखाच्या आसवांत सदा
भिजली माझी कोरडी रमाई
चंदनापरी सदैव झिजली
कोटी लेकरांची आई ।।धृ।।

पोटची चार गोळे हरवताना
किती आतून कुजली असेल रमाई
दीनदुबळ्या कोटी लेकरांची माई
माझी साधी भोळी रमाई ।।१।।

साहेबांची मोठी किर्ती
होता रमाईचा हात ग
रामू माझी त्याग मूर्ती
केली पहाडी संकटावर मात ग ।।२।।

साहेबांच्या परदेशी शिक्षणात
मायेच्या पदराखाली ही कोटी लेकरं
बांगड्या दागिने विकून
उपाशी लेकरांनी दिला ढेकर ।।३।।


नाही केले तुला दागिने
होते कुंकू अन् काळे मणी
हाल केले गरिबी सुगीने
ना खचली लेक भिकुची स्वाभिमानी
।।४।।

त्यागाच्या देहात रामूचा
आभाळभर मायेचा पदर
आज हि सुख,वैभव, दौलत सारी
इथ आनंदाचा बाजार ।।५।।

**कवी:- संतोष लक्ष्मीबाई दौलतराव. कदम शेकापूरकर.**
**मो.९०९६९०३८१३**

# माथ्यावर तळपे ऊन

लोकनेता न्यूज नेटवर्क




तापमानवाढ, हवामान बदल आणि नैसर्गिक आपत्ती हे शब्द आपण गेल्या दशकापासून ऐकत आणि अनुभवत आलो आहोत. 'युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंज'ने (यूएनएफसीसीसी : एक जागतिक करार) सुद्धा १.५ अंश सेल्सियस ही राखीव मर्यादा आणि २.० अंश से. ही अंतिम मर्यादा घालून दिली आहे. पॅरिस करारानुसार आणि सीओपीमध्ये सहमत झाल्यानुसार अनेक देशांनी शून्य कार्बन उत्सर्जनासाठी सन २०५० आणि सन २०७० ही मर्यादा दिली असली तरी आपल्याला २०३० हीच मर्यादा ठेवावी लागणार आहे. कारण तापमानवाढ १.५ अंश से.च्या पुढे गेली आहे. सन २०३०चे दरम्यान तापमान १.५ ते १.८ अंश से.पर्यंत वाढणार असून २.० अंश से.ची अंतिम मर्यादा सन २०३०पर्यंतच गाठण्याची शक्यता आहे.आज पृथ्वीचे तापमान वाढण्यास मुख्य कारण म्हणजे औद्योगिकरणातून उत्सर्जित होणारे हरित वायू. या विविध वायूंमुळे ग्रीन हाउस इफेक्टचा परिणाम म्हणून दिवस-रात्रीचे तापमान वाढले. सन १७५०मध्ये कर्ब वायूचे प्रमाण २७८ पीपीएम होते, ते आज २०२४मध्ये वाढून ४२० ते ४२२.१ पीपीएम इतके झाले आहे. मिथेन वायूचे वातावरणातील प्रमाण १९३४ पर्यंत ७१९ पीपीबी इतके होते, २०२४ मध्ये हे प्रमाण १९३४ पीपीबी झालेले आहे. नायट्रस ऑक्साइडचे प्रमाण १७५०मध्ये २७० पीपीबी होते, ते २०२३मध्ये ३३६.९ इतके वाढले आहे. सन १८५०-१९०० या ओद्योगिक काळाच्या पातळीवर (०.७२- ०.८० से.) तुलना केल्यास आज २०२३-२०२४ मध्ये सरासरी तापमानात १.५ अंश से. इतकी वाढ झाली आहे. जगात उत्तर अमेरिका (१.५० अंश से.), युरोप (१.२४ अंश से.), आफ्रिका (१.६ अंश से.) येथे सर्वाधिक वाढ झाल्याचे आढळले. आशियात तापमानवाढ १.०६ अंश से. इतकी आढळली. भारताचा विचार करता केरळ, पूर्व विदर्भ आणि आंध्र प्रदेश या भागांत वाढ जास्त होती. अरबी आणि पॅसिफिक समुद्राचे तापमान 'अल निनो'मुळे जास्त वाढल्याचा निष्कर्ष आहे. सन २०१५मध्ये वार्षिक सरासरी तापमान हे ०.४ अंश से.ने वाढले होते. आज २०२४ मध्ये ती वाढ ०.६ अंश से. आहे. 'अल निनो'चा हा प्रभाव मानला गेला तरीही मानवनिर्मित जल प्रदूषणामुळे समुद्रीय आम्लीयतेत वाढ होत असल्यानेही तापमान वाढते आहे. समुद्री तापमानाचा जागतिक हवामानावर मोठा परिणाम होतो.पृथ्वीवरील हवामान, पाऊस, अतिवृष्टी हे बाष्पाचे प्रमाण ठरवतात. बाष्पाचे प्रमाण अती वाढणे धोक्याचे असते. सन २०१६मध्ये हे प्रमाण ३.४ टक्क्यांनी वाढले. २०२३मध्ये ते ३.३ टक्क्यांनी, तर २०२४मध्ये ४.९ टक्क्यांनी वाढले. या वाढलेल्या बाष्पामुळे अतिवृष्टी, ढगफुटी यांच्या घटनांत वाढ झाली आहे.

उपग्रहीय आकडेवारीनुसार समुद्रपातळीत सन १९९३पासून वार्षिक २.१३ मिमी इतकी वाढ होत आहे. सन २०१४ ते २०२४ पर्यंत ही वाढ ४.७७ मिमी झालेली आहे. सेंटर फॉर सायन्स, टेक्नॉलॉजी अँड पॉलिसी या संशोधन संस्थेने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचा अभ्यास करून धक्कादायक निष्कर्ष काढले आहेत. या अभ्यासानुसार सर्व जिल्ह्यांत इ.स २०००च्या तुलनेत २०२०पर्यंत तापमानात खूप वाढ झाली असून असेच प्रदूषण सुरू राहिले तर सन २०३०पर्यंत तापमान एक अंश से.च्या वर, तर २०५०पर्यंत १.५ ते २.० अंश से. आणि २०८०पर्यंत २.५ ते ३.० अंश से. अशी वाढ सुरूच राहील. मात्र योग्य व योग्यवेळी उपाययोजना केल्यास ही वाढ ०.९ ते १.४ अंश से.पर्यंत नियंत्रित राहील.

महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यांत पावसाचे प्रमाण वाढणार आहे. सन २०३०पर्यंत या वाढीचे प्रमाण फार नसेल. मात्र उपाययोजना न झाल्यास २०५०-२०८० दरम्यान ही वाढ २० ते ४० टक्क्यांदरम्यान राहील. पावसाचे प्रमाण वाढण्याची शक्यता उत्तर महाराष्ट्रात सर्वाधिक असून ही वाढ ४० टक्के असू शकते, अशी शक्यता आहे. इतर जिल्ह्यांत ही वाढ १० टक्के असेल.

महाराष्ट्रातील समुद्रकिनारी भागात तापमानवाढ अधिक असेल, अशी शक्यता आहे. सन २०३०पर्यंत चार ते ३४ दिवस, सन २०५०पर्यंत १३ ते ६३ दिवस, सन २०८०पर्यंत ३२ ते १२५ दिवस अशी उष्ण दिवसांत वाढ होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

सन २०३०-२०५० पर्यंतच्या अंदाजानुसार महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत पावसाच्या प्रमाणात वाढ होईल. अतिवृष्टीचे सध्या तीन दिवस धरले जात असले तरी पुढील २०५०-२०८०च्या काळात त्यात पाच ते सात दिवसांनी वाढ होण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यांत सन २०३०-२०५० आणि २०८०पर्यंत अतिवृष्टीची तीव्रता वाढत जाण्याची शक्यता आहे. जास्त पाऊस पडला तरी अति उष्णतेमुळे जमिनीवरील पाण्याची वाफ होऊन कोरडे दिवस वाढतील. त्यामुळे पुढील काळात दरवर्षी हळूहळू ही वाढ होऊन सन २०३०पर्यंत दोन ते तीन दिवस वाढ होईल.

तापमानवाढीसाठी इतरही काही कारणे आहेत. सन २०२४मध्ये जे तापमान वाढले, त्या वाढीसाठी इतर अनेक घटक देखील कारणीभूत आहेत, असे संशोधनात आढळले. त्यात हुंगा-टोगा ज्वालामुखी स्फोट, एरोसोलचे प्रमाण कमी होणे, सूर्याची उष्णता जास्त शोषून घेणे, सूर्यावरील विस्फोट (सोलार मॅक्झिमम) आणि ग्रीनहाऊस इफेक्ट आदींचा समावेश आहे.या तापमानवाढीचे विविध पातळ्यांवर परिणाम होत आहेत. औद्योगिक विस्तार, शहरीकरण, जंगलाचे प्रमाण कमी होणे, लोकसंख्यावाढ, प्रचंड प्रमाणातील विकासकामे आणि प्रदूषण आदी मानवी कृतींमुळे तापमानात सातत्याने वाढ होत आहे. दरवर्षी ध्रुवीय बर्फाचे प्रमाण कमी होत असून त्यातून समुद्रातील पाण्याची पातळी वाढत आहे. उत्तर गोलार्धातील तापमान वाढत असून युरोपीय देशांमध्ये उष्ण लहरी, थंड लहरी आणि अतिवृष्टीत वाढ होत आहे. एकीकडे अनेक नद्यांतील पाणी आटत चालले आहे, तर दुसरीकडे काही नद्यांमुळे येणारे महापूर वाढले आहेत. वादळांचे प्रमाण वाढले आहे, वणव्यांच्या प्रमाणात वाढ होत आहे. या सगळ्या घडामोडींमुळे अन्न सुरक्षेची समस्या, देशांच्या वार्षिक उत्पनात घट, रोगराई-महासाथी अशा समस्या वारंवार उभ्या राहत आहेत. त्यातून लोकांच्या स्थलांतराचे प्रमाण आधीच्या तुलनेत चांगलेच वाढले आहे. आत्ताची ही स्थिती अशीच राहिली तर सन २०३०पर्यंतच तापमानात २.० अंश सेल्सियसची अंतिम मर्यादा गाठली जाईल, असा इशारा अनेकजणांचे संशोधन देत आहे. या सगळ्या समस्या लक्षात घेता जगातील अनेक देशांत विविध नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीत वाढ होऊन जीवन अधिकाधिक कठीण होत जाणार आहे.तापमानातील ही भयावह वाढ आणि हवामानबदलाच्या घटना कमी करायच्या असतील तर शून्य कार्बन उत्सर्जनाची अंमलबजावणी त्वरित करावी लागेल. जल-थल प्रदूषण कमी करावे लागेल. जमिनीवर वृक्ष लागवड आणि जंगले वाढविणे ही तातडीची गरज झाली आहे. शहरीकरण नियंत्रित करावे लागेल आणि सर्वत्र वनीकरण करावे लागेल. वाढत्या लोकसंख्येस आळा घालावा लागेल. विकास घडवणे आवश्यक आहेच. मात्र तो साधताना हवामानाला, पर्यावरणाला धक्का पोहोचणार नाही, याचे भान ठेवावे लागेल.

# खाद्यपदार्थ ऑनलाईन खरेदीची रिटर्न पॉलिसी तपासा

लोकनेता न्यूज नेटवर्क



हल्ली सर्वांचे ऑनलाईन खरेदीचे प्रमाण खूपच वाढले आहे. त्यात बहुत करून कपडे, इलेक्ट्रॉनिक्स व घरगुती उत्पादने आणि खाद्यपदार्थ या वस्तू खूपच प्रमाणात खरेदी केल्या जातात. कपडे आणि इतर उत्पादने खरेदी करताना त्याचे माप, त्याचा रंग किंवा त्याची वैशिष्ट्ये आपल्याला योग्य वाटली नाहीत किंवा आवडली नाहीत तर आपण ती वस्तू परत करण्याची सोय आहे का हे विकत घेण्यापूर्वी अगदी आवर्जून बघतो. खाद्यपदार्थ खरेदी करताना कदाचित ही रिटर्न पॉलिसी नीट बघितली जात नसावी. पण हीच आपली चूक नंतर महागात पडू शकते. कारण आपण ठरावीक खाद्यपदार्थ आपल्याला हव्या त्या ब्रँडचा आणि योग्य त्या मात्रेत खरेदी करतो.

मुंबईत राहणाऱ्या एका महिलेकडून असे दुर्लक्ष झाले. तिने न्यूट्रिशन फ्रेश एनर्जी ड्रिंक मिक्स लिंबू फ्लेवरचे १३ डबे एका ई-कॉमर्स माध्यमातून ऑक्टोबर २०२३ मध्ये खरेदी केले. त्याची किंमत होती ४६४१ रुपये. हे डबे त्याच महिन्यात या महिलेला घरपोच मिळाले. जेव्हा ते डबे तिने उघडले तेव्हा तिच्या लक्षात आलं की या शक्तिवर्धक पेयाचा रंग आणि पोत नेहमीसारखा नाही. शिवाय त्या डब्यावरील लेबलवर क्यूआर कोड सुद्धा छापलेला नाही. या सर्व गोष्टी पाहिल्यावर तिला हे उत्पादन बनावट व नकली वाटले आणि त्यामुळे ते तिने ई-कॉमर्स कंपनीला परत करण्याचा निर्णय घेतला. पण त्या ई-कॉमर्स कंपनीने तिची विनंती रद्दबादल ठरवली, कारण एकदा विकलेले उत्पादन परत न घेण्याची त्यांची पॉलिसी होती. (छे ीशींीप ििश्रळलू). त्यानंतर तिने या कंपनीच्या ग्राहक सेवा देणाऱ्या नंबरवर हा बनावट खाद्यपदार्थ परत करण्याबद्दल बरेचवेळा तक्रार केली, पण तिला तिच्या तक्रारीचे समाधानकारक उत्तर मिळाले नाही आणि पेय परतही करता आले नाही.

शेवटी तिने मुंबईतील ग्राहक न्यायालयात उत्पादक आणि ई-कॉमर्स माध्यम विक्रेता या दोघांच्याही विरुद्ध निकृष्ट दर्जाचे उत्पादन परत न घेतल्याबद्दल खटला दाखल केला. तेव्हा तक्रारदार महिलेने असा युक्तिवाद केला की, तिला मिळालेले उत्पादन निकृष्ट दर्जाचे होते आणि ते परत न घेणे म्हणजे ही त्यांची अनुचित व्यापार पद्धत आहे. केसच्या सुनावणीच्या वेळी आपले म्हणणे मांडताना पुरावा म्हणून तक्रारदार महिलेने त्या शक्तिवर्धक पेयाचे फोटो आणि ते उत्पादन परत घेण्यास नकार देणारे त्या कंपनीचे लेखी संदेश मुंबईतील जिल्हा ग्राहक आयोगापुढे सादर केले आणि ५० लाखांची नुकसानभरपाई मागितली. ऑनलाइन शॉपिंग फसवणूक, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मद्वारे होणारी फसवणूक, डिजिटल पेमेंट फसवणूक यापासून ग्राहकांना संरक्षण देण्यासाठी ग्राहक संरक्षण कायदा-१९८६ ची जागा ग्राहक संरक्षण कायदा २०१९ ने घेतली आहे.

ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी या कायद्यान्वये ई-कॉमर्स नियम तयार केले आहेत. यामध्ये 'उत्पादन दायित्व' हे महत्त्वाचे प्रावधान आहे. या तक्रारीचा अभ्यास करताना आयोगाने निष्कर्ष काढला की, कोणतीही ई कॉमर्स कंपनी तिच्या माध्यमातून विकल्या जाणाऱ्या उत्पादनाच्या दर्जासाठी ती जबाबदार आहे. तसेच ही कंपनी आणि विक्रेता सेवेतील कमतरता आणि अनुचित व्यापारी प्रथा या दोन्ही गोष्टी केल्यामुळे दोषी आहेत. त्यामुळे तक्रारदार महिलेला ४६४१ रुपये, ऑक्टोबर २०२३ पासून ९% व्याजासहित देण्याचे ग्राहक न्यायालयाने दोघांनीही आदेश दिले. शिवाय या खटल्याचा खर्च म्हणून रुपये १० हजार देणे बंधनकारक केले. पण ५० लाख रुपयांचा नुकसानभरपाई मिळण्याचा तिचा दावा मात्र मान्य केला गेला नाही, कारण त्या पेयात आरोग्यासाठी हानिकारक घटक पदार्थ आहेत हे तक्रारदार महिला सिद्ध करू शकली नाही. आपण ई कॉमर्स कंपनीच्या माध्यमातून खरेदी करतो तेव्हा, कपडे किंवा वस्तू घेताना त्या परत करण्यासाठी किती दिवस आहेत किंवा त्याची पद्धत काय आहे हे आवर्जून तपासतो. पण वरील उदाहरणावरून आता या माध्यमांतून खाद्यपदार्थ विकत घेतानासुद्धा त्याची रिटर्न पॉलिसी नीट पाहायला हवी. त्यांच्या सर्व अटी आणि शर्ती नीट समजून घेऊनच खरेदी करायला हवी. समजा काही कारणाने ग्राहकांची फसवणूक झालीच तर जागरूक ग्राहक बनून ई कॉमर्स कंपनी किंवा प्रत्यक्ष विक्रेता असेल तरी आपल्या योग्य उत्पादन मिळण्याच्या हक्कासाठी ग्राहक न्यायालयात दाद मागितली पाहिजे. जिल्हा, राज्य किंवा राष्ट्रीय ग्राहक आयोगाकडे खटला लढवताना ग्राहक आपली बाजू स्वतः मांडू शकतो. त्यासाठी वकिलाची आवश्यकता नसते. मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे ग्राहकांच्या कोणत्याही प्रकारच्या तक्रारीसाठी तक्रार मार्गदर्शन केंद्रे विनामूल्य चालवली जातात. इथे ग्राहकांना त्यांची तक्रार सोडविण्यासाठी सर्व प्रकारची माहिती देऊन सक्षम केले जाते. तसेच त्रस्त ग्राहक मध्यस्थीमार्फत तक्रारी सोडवण्यासाठी संस्थेच्याच 'समेट'चा उपयोग करू शकतात.

# त्यागमूर्ती माता रमाई

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मी वंदन करते आज**
**ज्ञान दिव्याच्या समईला ,**
**गोर गरीब बहुजनांच्या**
**भीमरावांच्या रमाईला .**

रमाबाई भीमराव आंबेडकर ह्या डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी होत्या ,आपण सर्वजण त्यांना रमाई म्हणून ओळखतो ,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर रमाईला प्रेमाने रामू म्हणून आवाज द्यायचे , रमा , रामु ही त्यांची टोपण नावे ,माता रमाई यांचा जन्म , ७ फेब्रुवारी १८९८ रोजी भिकू धुत्रे ( वलंगकर ) व रुक्मिणी या दांम्पत्यांच्या पोटी झाला ,रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले काही दिवसांनी वडिलांचे ही छत्र हरपले . पुढील त्यांचा सांभाळ त्यांचे काका व मामा यांनी केले 'रमाईचा विवाह बाबासाहेबांची १९०६ रोजी झाला त्यांचे वय ९ तर बाबासाहेबांचे वय १४ वर्षे होते ,त्यावेळी बालविवाह प्रथा होती विवाह नंतर बाबासाहेब शिक्षण व समाजकार्य यात गुंतलेले असताना रमाईं यांनीच आपले कुटुंब चालवले ' आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवताना रमाईंनी दुः खाशी व अडीअडचणीशी सतत सामना केला ' पण त्यांनी ही परिस्थिती बाबासाहेबांना कधीच कळवली नाही किंवा कळूही दिली नाही ,कारण बाबासाहेबांनी खूप शिकावे ' समाजाचा उद्धार करावा असेच रमाईंना वाटायचे ' व आपण बाबासाहेबांच्या या कार्यामध्ये कुठल्याही प्रकारचा अडथळा आणू नये असे त्यांना वाटायचे ,बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या कल्याणाचे जे ध्येय ठरवले होते ते पूर्ण होण्यासाठी रमाईंचे कणखर असलेली साथ कारणीभूत होती ,

**दारिद्र्याच्या झोतामधी**
**ती गरीबीत नाहली**
**बाबासाहेबांच्या विचारात ती**
**अंगी अलंकार पाहली .**

घर चालवण्यासाठी ह्या माऊलीने शेण गोवऱ्या थापल्या ,एका भारत देशाच्या बॅरिस्टर ची पत्नी हे काम करते असे लोकांना वाटू नये म्हणून पहाटे व सूर्यास्तानंतर त्या गौऱ्या थापायला जात ' बाबासाहेब लंडनला असताना १९२३ ला दुष्काळ पडला होता तेव्हा बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांनी रमाईचे हाल बघून त्यांना मदत देऊ केली पण



स्वाभिमानी असलेल्या रमाईंनी कार्यकर्त्यांचे आभार मानून मदत नाकारली , आपल्या ह्या संसारात आपल्या पोटच्या गोळ्यांचा मृत्यू त्यांनी डोळ्यादेखत पहिला , मुलगा गंगाधर गेल्यानंतर दुसरा मुलगा राजरत्नचा ही मृत्यू पाहिला ' राजरत्न गेल्याचे दुःख रमाई सहन करू शकली नाही . अतिशय लाडाचा असलेला राजरत्न गेल्याचे दुःख रमाईच्या मनावर झाले होते,असाच एक प्रसंग त्यावेळी बाबासाहेब आपले शिक्षण पूर्ण करून मुंबईला आले असताना त्यांचे स्वागत करण्याकरता खूप मोठी गर्दी जमलेली होती . बाबासाहेब यांचे कार्यकर्ते चाहते, अनुयायी , त्यांना हस्तांदोलन करत होते ,याप्रसंगी रमाई देखील त्या ठिकाणी उपस्थित होत्या रमाईला एकही चांगली साडी नेसण्यासाठी नसल्याने राजर्षी शाहू महाराजांनी बाबासाहेबांना सत्कार प्रसंगी दिलेल्या भरजरी फेटा नेसून रमाई त्या ठिकाणी उपस्थित होत्या 'बाबासाहेब बोटीतून उतरताच सर्व जमाव त्यांच्याजवळ असताना रमाई मात्र दूर उभी होती . बाबासाहेबांनी विचारले रामू तो इतकी दूर का उभी आहेस , तेव्हा रमाईंनी उत्तर दिले की सारा समाज तुम्हाला भेटायला आतुर असताना मी प्रथम भेटणे योग्य नाही . यातून रमाईंचे बाबासाहेबांच्या कार्याविषयी असलेले प्रेम त्यांच्याबद्दलच्या अभिमान दिसून येतो ,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या थॉट्स ऑन पाकिस्तान या पुस्तकात रमाईंचं त्यांच्या पाठीशी सार्थ उभं असणं , रमाईंच्या मनाचा मोठेपणा , चारित्र्याची शुद्धता , संघर्ष करण्याची वृत्ती याबद्दल लिहिले आहे . रमाई स्वतः शिक्षित नव्हत्या पण शिक्षणाबद्दल त्यांना आस्था होती बाबासाहेबांचे विचार व कार्य अस्पृश्यांचे तत्कालीन स्थिती याची तिला संपूर्णपणे जाणीव होती . रमाईंचे शरीर कष्टाने पोखरून गेलेले होते . आजार रमाईचा बळावला होता बाबासाहेबांनी खूप औषधोपचार केले पण प्रकृतीत कुठल्याही प्रकारची सुधारणा होत नव्हती १९३५ साली आजार विकोपाला गेला . बाबासाहेब स्वतः च्या हाताने त्यांना कॉफी व मोसंबीचा रस पाजण्याचा प्रयत्न करत . अखेर तो काळा दिवस उजाडला यशवंताची नव्हे तर आपल्या सर्वांची माता २७ मे १९३५ रोजी सर्वांना पोरके करून गेली ' बाबासाहेबांचा संसार प्रेमाने व धैर्याने सोबत करणाऱ्या रमाई कायमच्या सर्वांना सोडून निघून गेल्या , रमाई चे व्यक्तिचित्र पाहता आपण सर्वांनी विशेषतः स्त्रियांनी प्रेरणा घेऊन वाटचाल केली पाहिजे त्यांचे जीवन त्यागाची प्रचिती देते ' दुःख . त्याग,समजूतदारपणा ,कारुण्य ,उदंड मानवता व प्रेरणा म्हणजेच माता रमाई त्यांची आज जयंती त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन .

**–स्नेहल सिद्धार्थ सरकटे**
**(शिक्षिका ) बुलडाणा '**

# कंधार शहर व तालुक्यात शिवसेनेचे ऑनलाईन सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षातर्फे पक्षबांधणीसाठी आणि नव्या युवकांना संधी देण्यासाठी शिवसेना सदस्य नोंदणी अभियान दि.२३ जानेवारीपासून शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती दिनी पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका कंधारच्या वतीने सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात झाली आहे.




विधानसभा निवडणुकीत आलेले अपयश आणि पक्षांतर याच्या पार्श्वभूमीवर आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक जिंकण्यासाठी पक्षाने कंबर कसली असून त्यासाठी ऑनलाईन सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. नांदेड जिल्हा प्रमुख भुजंग पाटील, बबन बारसे यांनी लोहा–कंधार विधानसभा निवडणुकीत मिळालेले मताधिक्य टिकून राहील याची काळजी घेण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. जिल्हा परिषद गट, पंचायत समिती, गाव निहाय नोंदणी अभियान राबविण्यात येते आहे. जिल्हा परिषद गटसाठी किमान १००० सदस्य, पंचायत समिती गणासाठी ५०० तर प्रत्येक गाव निहाय १०० सदस्य नोंदणी यासाठी जवाबदारी निश्चित केली असून उपजिल्हा प्रमुख भालचंद्र नाईक, कंधार तालुका प्रमुख परमेश्वर जाधव, शेतकरी आघाडीचे प्रमुख शिवाजी कदम, तालुका संघटक पंडित देवकांबळे, उप तालुका प्रमुख दादाराव पा शिंदे, उप तालुका प्रमुख संदीप पाटील काळम, उपतालुका प्रमुख सय्यद अबरार, उस्मान नगरचे माजी सरपंच अमीन भाई आदमनकर माजी सरपंच अमीनशहा फकीर माजी उपसरपंच राहुल सोनसळे गुरुजी, सामाजिक कार्यकर्ते अशोक पाटील काळम युवासेना सर्कल प्रमुख संतोष पाटील घोरबांड आनंद पाटील घोरबांड, उद्धव पाटील घोरबांड, रोहिदास शिरढोणकर, नामदेव गंगातिरे, हनुमंत घोरपडे, सर्व शिवदूत, शाखाप्रमुख, शिवसैनिक याच्यावर जवाबदारी दिली असून कंधार शहरात प्रत्येक वार्ड निहाय १०० तर प्रभाग निहाय ३०० सदस्य नोंदणी यावर भर देण्यात येणार आहे. कंधार शहरात ज्येष्ठ शिवसैनिक माजी नगरसेवक श्री गणेश कुंटेवार, शहर अध्यक्ष अतुल पापिनवार, उपाध्यक्ष कपिल जोंधळे, रमेश लुंगारे, रविराज जाधव,आशिष जोगे, व्यंकटेश फुले, रहीम शेख, यांच्याकडे जवाबदारी दिली आहे. लवकरच पक्ष संघटना मजबूत व बळकट करण्यासाठी आढावा बैठक, तालुका पदाधिकारी मेळावा घेण्यात येणार असून त्यासाठी उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जुने–नवे शिवसैनिक कामाला लागले असून शिवसेना पक्ष नव्याने उभारी घेईल हीच अपेक्षा व्यक्त होत आहे.

# क्राईस्ट इंटरनॅशनल स्कूल,तळेगाव,अहमदपूर व लातूर भारत स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा मेळाव्याची मोठया उत्साहात सुरुवात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । विष्णू मोहन पोले**

दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी क्राईस्ट इंटरनॅशनल स्कूल तळेगाव, अहमदपूर येथे कब–बुलबुल व स्काऊट–गाईड लातूर जिल्हा मेळाव्याची सुरूवात ध्वजारोहनाने झाली. तसेच सन्मान सभा आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष क्राईस्ट स्कूलचे संस्थाध्यक्ष जीवनकुमार मद्देवाड यांनी सर्व युनिट लीडर्सना वेळेचे नियोजन व शिस्त याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा संघटक डॉ . शंकर चामे, राज्य प्रशिक्षण आयुक्त डॉ गोविंद केंद्रे मुंबई, प्राचार्य जेबाबेरला नादार यांची प्रमूख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. ज्येष्ठ स्काऊटर एस. एच. सौदागर यांनीही सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच सर्व सहभागी मेळाव्यातील स्काऊट–गाईड यांची पथसंचलन, बँड पथक, शारिरीक कौशल्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या व ७ फेब्रुवारी रोजीच्या उद्घाटन कार्यक्रमाची पूर्वतयारी झाली आहे. मेळाव्यात एकूण ३५ शाळांनी नोंदणी केली आहे. तसेच वेगवेगळ्या शाळेतील समूहांनी शारीरिक कसरतीतून कौशल्याचे सादरीकरण केले. त्यानंतर सायंकाळी भव्य शेकोटी कार्यक्रमातून विविध गुणदर्शन करण्यात आले, यावेळी शाळा समन्वयक संगमेश्वर ढगे, सोनवळे सर, युवराज माने, जे. एस. कनले, अंकुश केंद्रे, वरिष्ठ लिपिक सचिन सुरवसे, धोंडीराम पाटील, सुगावे बालाजी, मनोजकुमार मठपती, प्रमोद कटके, नामदेव हराळे, रमेश नलमले, स्वामी विजयालक्ष्मी, स्वामी शुभांगी, आरती कोल्हे, जगदीश केंद्रे, जयप्रकाश कंदले, शीतल वाडीकर, क्राईस्ट शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचीही उपस्थिती लाभली.

# पारनेर बसस्थानकाचे खा.नीलेश लंके यांच्या हस्ते भूमिपूजन;२ कोटी ६६ लाख रूपयांचा निधी मंजुर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्यानंतर मंजुर करण्यात आलेल्या पारनेर येथील बसस्थानकाचे रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता खा. लंके यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात येणार असल्याची माहिती पारनेरचे नगराध्यक्ष नितीन अडसूळ व उपनगराध्यक्ष जयदा शेख यांनी दिली.

पारनेर बसस्थानक सन १९८५ मध्ये बांधून पुर्ण झाल्यानंतर ४० वर्षांच्या कालखंडानंतर बसस्थानकाची वास्तू उभी राहणार आहे. बसस्थानकाच्या स्वच्छता गृहाच्या बाजूला असलेल्या मोकळया जागेत हे बसस्थानकाची वास्तू उभी राहणार असून हे बांधकाम झाल्यानंतर जुन्या बसस्थानकाचे निर्लेखन करण्यात येणार आहे.

त्यानंतर त्या जागेवर बीओटी तत्वावर व्यापारी संकुल उभे राहणार आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी पारनेर व सुपा बसस्थानकासाठी नवी इमारत तसेच व्यापारी संकुलासाठी पाठपुरावा सुरू केला होता.

कोरोना संकटामध्ये दोन वर्षे त्यात खंड पडला. सन २०२० पासून सन २०२४ पर्यंत खा. लंके यांनी या कामासाठी पत्रव्यवहार केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन या कामासाठी २ कोटी २५ लाख रूपयांचा निधी मंजुर होऊन राज्य परिवहन महामंडळाकडून निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात येऊन १५ मार्च २०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला.

पुढे काही तांत्रीक अडचणी निर्माण झाल्याने हे काम सुरू होउ शकले नाही. त्यामुळे खा. नीलेश लंके यांनी दि.२१ जानेवारी २०२५ रोजी राज्य परिवहन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांकडे पत्रव्यवहार करून रखडलेल्या कामाकडे लक्ष वेधले होते. कामाला विलंब झाल्याने २ कोटी ६६ लाख रूपये अंदाजपत्रक असलेल्या कामास मंजुर देण्यात आली. रविवारी या कामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे.

## सम्राट मित्र मंडळाच्या पाठपूराव्यास यश


# अखेर नॅशनल हायवे अहमदपूर–शिरूर ताजबंद आणि चाकूर येथे अपघात विरोधी यंत्रणा कार्यान्वित


लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । पोले विष्णू मोहन**

गेल्या अनेक महिन्यांपासून या ना त्या कारणाने नॅशनल हायवेच्या अहमदपूर शहर, शिरूरताजबंद शहर आणि चाकूर शहराला जोडणाऱ्या बायपासच्या सुरूवातीच्या आणि शेवटच्या ठिकाणी स्पीडब्रेकर,फलक,लाईट आदी प्रलंबित असलेली अपघात विरोधी यंत्रणा तातडीने कार्यान्वित करावे यासाठी दिनांक ६ फेब्रुवारी रोजी अहमदपूर–शिरूर ताजबंद आणि चाकूर शहर बंदचा ईशारा देताच खडबडून जागे झालेल्या नॅशनल हायवेच्या प्रशासनाकडून दोन दिवसात यंत्रणा कार्यान्वित करण्याचे लेखी पत्र काल दिनांक ५ फेब्रुवारी रोजी देवून आज लगेचच या कामाला सूरूवात करण्यात आली.







नॅशनल हायवे ३६१वर वहातूक सूरूवात झाली मात्र या तिन्ही शहराच्या ठिकाणी अपघात विरोधी यंत्रणा नसल्या कारणाने सतत छोटे मोठे अपघात होत होते.या मध्ये अनेकांचे जीव गेले.अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत.मात्र वारंवार विनंती करून निवेदन देवून सूध्दा कूठलीच कार्यवाही केलेली नाही. या बाबत माजी आमदार लोकनेते बब्रुवान जी खंदाडे साहेब यांनी सूध्दा प्रकल्प संचालकाकडे फोन वरून सूचना देवून लेखी पत्र सूध्दा पाठविले होते. या बाबत सम्राट मित्रमंडळ–लातूर अहमदपूर वतीने नॅशनल हायवे अथोरेटी ऑफ इंडीया यांच्या नांदेड येथील प्रकल्प संचालकाकडे निवेदन दिले होते मात्र तरीही कूठलीच कार्यवाही झाली नाही.मात्र या तिन्ही ठिकाणी अपघाताची मालिका चालूच होती.

शेवटी नाविलाजाने सम्राट मित्रमंडळ–लातूर अहमदपूर च्या वतीने युवा नेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी पूढाकार घेवून या तिन्ही ठिकाणी तातडीने अपघात विरोधी यंत्रणा कार्यान्वित करावी अन्यथा अहमदपूर शहर–शिरूर ताजबंद शहर आणि चाकूर शहर पूर्णपणे बंद करण्याचा ईशारा प्रशासनास दिला होता. या नंतर प्रशासन अलर्टमोड वर येत उपविभागीय अधिकारी अहमदपूर व तहसीलदार अहमदपूर यांनी या बाबत नॅशनल हायवेच्या प्रकल्प संचालकांना ही गंभीर बाब कळवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास आपण जवाबदार रहाल अशा प्रकारचे लेखी पत्र काढून त्यांना अहमदपूर येथे बैठकीस पाचारण करण्यात आले.तहसील कार्यालय अहमदपूर येथे नॅशनल हायवे चे संबंधीत अधिकारी व सम्राट मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यां सोबत बैठक घेण्यात येवून या विषयी चर्चा करण्यात आली.शेवटी पूढील दोन दिवसात अहमदपूर शिरूरताजबंद आणि चाकूर या तिन्ही ठिकाणी स्पीडब्रेकर,फलक,लाईट अशा अपघात विरोधी यंत्रणा कार्यान्वित करण्याचे लेखी पत्र दिले होते.त्या नंतर बंद अंदोलन मागे घेण्यात आले होते. लेखी पत्र दिल्या नूसार आज लगेचच या कामाला मरशिवणी(अहमदपूर) येथे सूरूवात करण्यात आली.उद्या पर्यंत शिरूरताजबंद आणि चाकूर येथे हे काम पूर्ण होणार आहे. अपघात विरोधी यंत्रणा कार्यान्वित केल्याने अपघाताचे प्रमाण कमी होऊन लोकांचे जीव वाचवणार असून जनतेचा सुरक्षित प्रवास होण्यास मदत झाली आहे. जिल्हा व तालूका प्रशासनाने अतिशय चांगल्या पध्दतीने हा विषय हाताळल्या बद्दल जिल्हाधिकारी सौ.वर्षाताई ठाकूर घुगे,उपजिल्हाधिकारी मंजूषा लटपटे,तहसीलदार उज्वलाताई पांगरकर मॅडम, पोलिस उपाधिक्षक मनिष कल्याणकर साहेब,पोलिस निरीक्षक भूसनूर साहेब आणि पत्रकार बांधव आदींचे सम्राट मित्र मंडळाच्या वतीने युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी,अजय भालेराव,भिमराव कांबळे,सचिन बानाटे,आकाश पवार,गणेश मूंडे,दयानंद वाघमारे आदींनी आभार व्यक्त केले आहे.

## जयभवानीत बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

# उत्कृष्ट नागरिक व्हा, आईवडीलांना खंत वाटेल असे वागू नका-प्रविणकुमार बांगर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**




विद्यार्थी मित्रांनो तुम्ही भारताचे भावी आधारस्तंभ आहात. उत्कृष्ट नागरिक बना, आपल्या आई-वडिलांना खंत वाटेल असे वागू नका. प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षेत घवघवीत यश मिळवा आणि आपल्या आई-वडिलांचे नाव मोठे करा असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांनी केले. जयभवानी कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमात ते बोलत होते .

शिवाजीनगर गढी येथील जयभवानी कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गेवराई पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ, पोलीस जमादार संजय राठोड, सुप्रसिद्ध भारूडकार प्रभाकर कुटे, सुप्रसिद्ध मृदंगाचार्य चंद्रकांत शेळके, प्राचार्य व्ही. पी. राठोड, उपप्राचार्य प्रा.आनंद बडवे, प्रा.सुरेश तळेकर, प्रा.भोसले यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले सुप्रसिद्ध भारुडकार प्रभाकर कुटे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या विनोदी शैलीतून मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी व्यसनमुक्ती, व्यक्तिमत्व विकास बेटी बचाव, हुंडाबंदी, वृक्षारोपण आदी विषयावर मार्गदर्शन केले. आपल्या विनोदी शैलीतून मार्गदर्शन करताना त्यानी विद्यार्थ्यांची हसता हसता पुरेवाट केली. तुमच्यामध्ये मला जिजाऊ दिसते त्यांचा आदर्श मुलींनी घेतला पाहिजे. पोरांनो शाळा शिका, अडाणी राहू नका मोठे व्हा, यशवंत व्हा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ म्हणाले की, विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास केला पाहिजे. स्पर्धा परीक्षेची तयारी करा आणि मोठ्या मोठ्या पदावर जा. जीवनात शिस्तीने वागा. आपल्या आईवडिलांचे नाव मोठे करा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य व्ही.पी राठोड यांनी केला. कार्यक्रमात कु.अर्चना ससाने, कु.अर्चना घल्लाळ, कु.अंजली सिरसट या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा.आनंद बडवे, प्रा. भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.नंदकिशोर तळेकर यांनी केले. सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.सत्यप्रेम लगड यांनी करून उपस्थितांचे आभार प्रा. आडागळे यांनी मानले.यावेळी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# लोहा येथील कै.नळगे विद्यालयात विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**



लोहा शहरातील कै. विश्वनाथराव नळगे विद्यालयात दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी विज्ञान प्रदर्शन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. लोहा शहरात शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व हजारो गुणवंत विद्यार्थी घडविणाऱ्या कै. विश्वनाथराव नळगे विद्यालयात दि. १५ फेब्रुवारी रोजी विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले . त्यामध्ये एकुण १७५ विद्यार्थ्यांनी चंद्रयान, हायड्रोलिक लिफ्ट, ज्वालामुखी,सौर उर्जा, रक्ताचे शुध्दीकरण,मेंदुचे कार्य, पर्यावरण पुरक, पाण्याचे व्यवस्थापन, आदी विविध प्रयगाचे प्रत्याक्षीक करुन दाखविले. विज्ञान दृष्टीकोन विद्यार्थ्यांत निर्माण व्हावा यासाठी कै. विश्वनाथराव नळगे विद्यालयाचे मुख्याध्यापक/ प्राचार्य अनिल हामदे सरांनी सांगितले.संपुर्ण विज्ञान प्रदर्शनासाठी श्री नारायण गोणे सरांच्या माध्यमातून विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले. त्यांना उतरवार सर,कारले मॅडम,नामवाड सर,नलवाड सर, जाधव सर, शिंदे सर, यांनी सहकार्य केले. याप्रसंगी या भव्य विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष केरबा सावकार बिडवई, उपाध्यक्ष शंकर वट्टमवार, सचिव अशोक चालिकवार, संचालक लक्ष्मीकांत बिडवई, नारायण चुडावकर उपस्थित होते. तसेच सदरील विज्ञान प्रदर्शनाला लोहा पं.स. चे गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे, शिक्षण विस्तार अधिकारी बाबुराव फसमले, श्रीमती अंबलवाड, यांनी भेट देऊन विज्ञान प्रदर्शनाचे कौतुक करुन समाधान व्यक्त केले. यावेळी कै.विश्वनाथराव नळगे विद्यालयाचे मु.अ./ प्राचार्य अनिल हामदे सर, प्रा.मु.अ. बालाजी तांबुळे सर, पर्यवेक्षक जाधव यांच्यासहित सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# क-हेवडगाव ग्रा.प.च्या वतीने भव्य आरोग्य शिबीर रक्तदान शिबीरात, रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

## क-हेवडगाव येथील सरपंच परिवंत गायकवाड यांचा अनोखा उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



क-हेवडगाव येथील सरपंच परिवंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आ.धस यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायतीच्या वतीने भव्य आरोग्य शिबीर व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.या शिबीरात रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला,ज्यामुळे या उपक्रमाला मोठे यश लाभले. आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय पाणीदार आमदार सुरेश धस यांचा २ फेब्रुवारी रोजी वाढदिवस अनर्थ खर्च न करता शाल हार तुरे फेटे न आणता सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करण्याचे आ.धस यांनी आवाहन केल होते.या आवाहनाला प्रतिसाद देत वाढदिवसाचे औचित्य साधत तालुक्यातील क-हेवडगांव ग्रामपंचायत चे सरपंच तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक परिवंत गायकवाड व ग्रामपंचायत कार्यालय क-हेवडगांवच्या यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर व नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.शेकडो ग्रामस्थांनी या शिबीराचा लाभ घेतला.

आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी मतदार संघात विविध सामाजिक उपक्रमासह मनोरंजन कार्यक्रम संपन्न होत असतात.यंदाचा वाढदिवस अनर्थ खर्च न करता शालेय विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप व सामाजिक उपक्रम राबविण्याचे आ.सुरेश धस यांनी आवाहन केले होते या आवाहनाला प्रतिसाद देत क-हेवडगांव ग्रामपंचायत चे सरपंच तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक परिवंत गायकवाड व ग्रामपंचायत कार्यालय क-हेवडगांव यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर व नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन दि २ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. ३० रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले तर शेकडो ग्रामस्थांनी नेत्र शिबीराचा लाभ घेतला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच वंदनाताई गायकवाड,युवा नेते जयदीप गायकवाड,राजू बोराडे,किरण गायकवाड आदींनी परिश्रम घेतले. सरपंच गायकवाड यांचा हा उपक्रम गावातील नागरिकांच्या आरोग्यविषयक जनजागृतीसाठी महत्त्वपूर्ण ठरला असून,अनेकांना आवश्यकतेच्या वेळी रक्ताचा पुरवठा होईल.हे शिबीर ग्रामपंचायतीच्या सहकार्याने आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून राबविण्यात आले आहे.

## अर्जित रजा मार्गी लावण्यासाठी

# आ.सतीश चव्हाण व विक्रम काळे यांची शिष्टमंडळाने घेतली भेट!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



खाजगी प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांचे अर्जित रजा अनुज्ञेय असताना अर्जित रजा रोखीकरण अनुज्ञेय नाही,असे शिक्षण संचालक (प्रा.) पुणे यांने आदेशित केले,पुर्वी लक्ष प्रभावाणे देयक अर्जित रजा रोखीकरण देण्यात यावे यासाठी निवेदन दि.६ फेब्रुवारी २०२५ रोजी कुंडलवाडी येथे शिक्षक आमदार मा.विक्रम काळे व पदवीधर आ.सतीश चव्हाण यांची भेट शिष्टमंडळाने घेऊन निवेदन दिले,

दि.२३ जानेवारी २०१३ अप्पर सचिव महाराष्ट्र शासन श्री प्र.सु.प्रधान यांचे पत्र क्र.२०१२/ स.क्रं. ३२८/१२/माशि-२ शाले शिक्षण क्रिडा मंत्रालय,मुंबई व दि. १५ फेब्रुवारी २०१३ शिक्षक संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्रान्वये दि.९ एप्रिल २०१३ अन्वये रजा रोखीकरणा संदर्भातील आदेश खाजगी प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांनाही लागू असल्याने दि.१ मे २०२४ पर्यंत खाजगी प्राथमीक शाळेतील मुख्याध्यापकांचे अर्जि रजा अनुज्ञेय माणून रजा रोखीकरण करण्यात आले परंतु दि. ३० मे २०२४ च्या मा. शिक्षण संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य पुणे शरद गोसावी यांनी खाजगी प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांना अर्जित रजा रोखीकरण अनुदेय नाही.असे लेखी पत्र दिल्यामुळे रोखीकरणाचे बिले स्वीकाले जात नाहीत.ज्याचे स्वीकारले आहेत.त्यांना शिक्षणाधिकारी प्रा.जि.प. नांदेड यांचे दि.२४ जानेवारी २०२४ जा.क्रं. ५८३ पत्रान्वये अर्जित रजा रोखीकरण अनुज्ञेय नाही.करीता आपला प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.असे कळविले असून विनंती की. खाजगी प्राथमिक मुख्याध्यापकांना अर्जित रजा रोखीकरणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्यावे अशी विनंती मागणी द्वारे करण्यात आली,

कुंडलवाडी येथे गंगाबाई सबन्नवार उच्च मा.विद्यालयातील प्रा.शंकरराव पवार यांच्या सेवानिवृती कार्यक्रमास शिक्षक आ मा.विक्रम काळे व पदवीधर आ.सतीश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती,यावेळी महाराष्ट्र राज्य मान्य खाजगी शिक्षक महासंघाच्या वतीने निवेदन देण्यात आले.महासंघ प्रांत उपाध्यक्ष हरीहर चिवडे,नांदेड जिल्हा सचिव,हनमंतराव डाकोरे,महासंघ कंधार तालुकाध्यक्ष भास्कर पाटील कळकेकर,शिक्षक नेते राजहंस शहापुरे,महासंघ जिल्हा संघटनमंत्री दिगांबर वाघमारे, सुभाष मुंडे,पत्रकार तथा महासंघ जिल्हा उपाध्यक्ष अशोक दगडे,पाटील सर, देशमुख,देगावकर,टिपराळे सर,शरीफ सर,काळेकर सर, सूर्यवंशी सर,कापसे सर,या सर्व उपस्थित मंडळींनी दोन्ही आमदारांना भेट देऊन मुख्याध्यापकांना रजा रोखीकरणाचे देयक नाकारल्यामुळे यांना निवेदन देण्यात आले,

# आष्टी तालुका पत्रकार संघ सदस्यांचा प्रयाणराज, आयोध्या दौरा!

## धार्मिक स्थळांना भेटी देत धार्मिक दौरा परतणार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

मराठवाड्याच्या बीड जिल्ह्यातील आष्टी तालुका पत्रकार संघाच्या सदस्यांचा सातत्याने विविध क्षेत्रांना भेटी देत प्रयोगशील तेव्हा महत्त्व देणाऱ्या कार्यक्षम लेखनिकांची संघटना म्हणून संबोधले जाणाऱ्या सदस्य आणि पदाधिकाऱ्यांचा दौरा प्रयागराज,उज्जेन,आयोध्यासह धार्मिक स्थळांना भेटी देणारा असून १० फेब्रुवारी रोजी आष्टीत परतणार आहे.

आष्टी तालुका पत्रकार संघाचे १२ (एक डझन ) सदस्यांचा नियोजीत प्रयाणराज दौरा आहे.हा दौरा आता नागपुराच्या पुढे जबलपुरला पोहचला असुन सकाळी प्रयागराजला पोहचणार आहे.नंतर आयोध्दा, उज्जैन करुन परतीचा प्रवास १० फेब्रुवारीला आष्टीत पोहचणार असल्याची माहिती ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी भ्रमणध्वनीवरून दिली. पत्रकार आष्टी तालुका पत्रकार संघाने यापूर्वी अनेक ऐतिहासिक राष्ट्रीय स्मारके,धार्मिक क्षेत्र आदी सह राष्ट्र पुरुषांच्या महत्त्वपूर्ण स्थळांना भेटी देत आपल्या लेखणीच्या कर्तव्यांबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याच्या अनुषंगाने दौरे काढलेले आहेत.या वैविध्यपूर्ण नटलेल्या ऐतिहासिक स्थळ भेटीतून आणि प्रवासातून आपल्या लेखणीला बळ मिळते असे नमूद करत ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्लभाऊ सहस्त्रबुद्धे यांनी या विविधतेतून समता,राष्ट्रीय एकता, बंधुभाव सर्वधर्म समभाव या मूल्यांची रुजवून होते असे सांगितले.दरम्यान, आज मार्गक्रमित झालेल्या या आष्टी तालुका पत्रकार संघाच्या दौऱ्यात ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे,उत्तम बोडखे,दत्ताभाऊ काकडे,प्रा.डॉ.विनोद ढोबळे,पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण पोकळे,शरद तळेकर,भीमराव गुरव,गणेश दळवी,रघुनाथ कर्डिले,संतोष सानप,सचिन रानडे,मनोज पोकळे आदी सह पदाधिकारी आणि सदस्य सहभागी आहेत.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904